# गम्मत

आजकाल पिझ्झा, केक, बर्गर, आईस्क्रीम, तंदुरी इत्यादि घरी करून पाहिले जातात आणि कुरडई, पापड, लोणची विकत घेतात .....!

त्याउलट म्हणजे घरी केलेले पदार्थ हॉटेल सारखे झाले नाहीत म्हणून बोंब मारायची. आणि बाहेर हॉटेलमध्ये गेल्यावर घरगुती जेवणं कुठे मिळेल ते शोधत बसायचं....!

याहूनही कहर म्हणजे घरी गॅस संपला किंवा मिक्सर बिघडला अथवा कुकरचा व्हाल्व गेला की त्रागा करुन तत्काळ कसा सुधारेल ते बघतात आणि बाहेर जाऊन चुलीवरचं अमुक, पाट्यावरच्या मसाल्याचं टमुकं, मडक्यात मंद आचेवर शिजवलेलं ढमुकं किती छान चविष्ट असतं, होतं हे कौतुक करुन जास्तीचे चार पैसे मोजायचे...... आहे कि नाही हो खरी गम्मत !!

"जीभ की टेस्ट
पेट मे जाता वेस्ट
बिमारी बनती गेस्ट
डॉक्टर करते रहते टेस्ट
तब अपने रुपये होते वेस्ट
इसलिये घर की रोटीसब्जी बेस्ट"



सौ. उज्वला श्रीराम प्रभुणे
अमरावती.